**प्रेस नोट**

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - २४/०७/२०१९

**वानवडी पोलीसांनी सराईत गुन्हेगारास पकडुन त्याचेकडुन एकुण ३८ मोबाईल व दोन मोटार सायकली जप्त**

दिनांक २३/०७/२०१९ रोजी वानवडी पोलीस ठाण तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे वानवडी पोलीस ठाणेस हजर असताना **पो.शि.नवनाथ खताळ, व पो.शि.नासीर देशमुख** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, म्हसोबा मंदीर काळेपडळ कंजार भाट वस्तीकडे जाणारे रोडवर एक इसम थांबलेला असुन त्याचेजवळ एक ग्रे रंगाची पल्सर २२० मोटार सायकल असुन ती चोरीची असल्याचा संशय आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे तात्काळ सदर ठिकाणी जावुन त्यांनी बातमीप्रमाणे संशयीत इसमास **बजाज पल्सर २२० क्रमांक MH-12/GY/150** हिचेसह ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव पत्ता **अजय रणछोड उर्फ राजु खरे वय २० वर्षे रा.काळेपडळ रेल्वे गेट जवळ म्हसोबा मंदीरा शेजारी गल्ली नंबर १ हडपसर पुणे मुळ गाव मु.पो. ओझर ता.गंगापुर जि.औरंगाबाद** असे असल्याचे सांगीतले असुन त्यास त्याचेकडे मिळुन आलेल्या मोटार सायकलबाबत अधिक विचारणा केली असता त्याने सदरची मो.सा.ही त्याचा साथीदार नामे साहील इनामदार रा.आदर्शनगर जे.एस.पी. एम. कॉलेजच्या मागे याचेसोबत चोरी केल्याचे कबुल करुन तसे तपासात निष्पन्न झाले आहे. सदरबाबत वानवडी पोलीस ठाणे अभिलेखाची माहीती घेतली असता गुन्हा रजि.नंबर १२७/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९ मधील असल्याचे निष्पन्न झाले असुन नमुद इसमास दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. तसेच त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्याचेकडुन **एकुण ३८ मोबाईल व दोन मोटार सायकल असा एकुण ३,००,०००/-** रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही श्री सुनिल फुलारी सो, अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग, पुणे शहर, श्री सुहास बावचे सो, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ५, पुणे शहर, श्री सुनिल देशमुख, सहा. पोलीस आयुक्त हडपसर विभाग, पुणे शहर (अतिरिक्त कार्यभार वानवडी विभाग) श्री क्रांतीकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक श्री रविंद्र गायकवाड, सहा.पो. फौज.रमेश भोसले, पो.हवा.राजु सासगे, पो.ना.योगेश गायकवाड, पो.ना.संभाजी दिवेकर, पो.शि.सुधीर सोनवणे, पो.शि.प्रतिक लाहिगुडे, पो.शि.महेश कांबळे, यांचे पथकाने केली आहे.


वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर